# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

**Date – 04 April 2024**

**Time 18.10 to 18.20**

**Language Marathi**

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – ०४ एप्रिल २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- आय आय टी मुंबईत कर्करोगावरील CAR-T सेल उपचार पद्धतीचं राष्ट्रपतींच्या हस्ते लोकार्पण, नव्या उपचार पद्धतीमुळे मानव जातीसाठी आशेचा नवा किरण
- लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत आज संपली, नांदेडमध्ये एकाच दिवसात ७२ उमेदवारी उर्ज दाखल
- अकोल्यातून प्रकाश आंबेडकर, अमरावतीत नवनीत राणा, नांदेडमधून प्रतापराव चिखलीकर, हिंगोलीतून बाबूराव कोहळीकर यांचे निवडणुकीसाठी अर्ज दाखल
- नवनीत राणा यांचे जात प्रमाणपत्र वैध, सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाने राणा यांना मोठा दिलासा

आणि

- राज्यात उष्णतेची लाट सुरूच, वर्धा इथं सर्वाधिक ४२ पूर्णांक ५ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद

****

कर्करोग रुग्णांसाठी CAR-T सेल उपचार पद्धतीमुळे सर्व मानव जातीसाठी आशेचा नवा किरण निर्माण झाल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. त्यांनी आज आय आय टी मुंबईत CAR-T सेल उपचार पद्धतीचं लोकार्पण केलं. त्यानंतर आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. पूर्णपणे भारतीय बनावटीच्या या उपचार पद्धतीमुळे अनेकांचे प्राण वाचणार आहेत, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. या उपचार पद्धतीमुळे भारताला प्रगत वैद्यकीय सेवा देणाऱ्या देशांच्या यादीत

स्थान मिळालं असल्याची भावना राष्ट्रपतींनी व्यक्त केली. राज्यपाल रमेश बैस यांचीही यावेळी व्यासपीठावर उपस्थिती होती.

****

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत आज सायंकाळी संपली. या टप्प्यात १२ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधल्या ८८ लोकसभा मतदारसंघांमधे निवडणूक होणार आहे. राज्यातल्या बुलडाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ-वाशिम, हिंगोली, नांदेड आणि परभणी या ८ लोकसभा मतदारसंघात दुसऱ्या टप्प्यात मतदान होणार आहे.

****

लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आजच्या शेवटच्या दिवशी नांदेड मतदारसंघातून ७२ अर्ज दाखल झाले आहेत. आतापर्यंत एकूण ९२ अर्ज दाखल झाले असल्याची माहिती जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी दिली आहे. अर्जाची छाननी ५ एप्रिलला होणार असून आठ तारखेला अंतिम उमेदवार निश्चित होतील.

****

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत आज हिंगोलीत महायुतीचे उमेदवार म्हणून शिवसेनेचे बाबुराव कदम कोहळीकर यांनी अर्ज भरला. यापूर्वी पक्षानं इथून विद्यमान खासदार हेमंत पाटील यांना उमेदवारी जाहीर केली होती. मात्र, कार्यकर्ते आणि नागरिकांच्या नाराजीनंतर येथील उमेदावर बदलण्यात आला.

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी आज अकोल्यातून अर्ज भरला.

अमरावतीमध्ये भाजपा उमेदवार नवनीत राणा यांचा अर्ज भरण्यापूर्वी आज जाहीर सभा घेण्यात आली. भाजप नेते, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यावेळी उपस्थित होते.

नांदेडमध्ये भाजपा उमेदवार प्रतापराव पाटील चिखलीकर अर्ज दाखल करायला गेले त्यावेळी माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांची उपस्थिती होती. वंजित बहुजन आघाडीचे उमेदवार अविनाश भोसीकर यांनीही नांदेडमधून आज अर्ज भरला आहे.

वंचित बहुजन आघाडीकडून दोन दिवसांपूर्वी परभणीतून बाळासाहेब उगले यांना उमेदवारी देण्यात आली होती. परंतु आज शेवटच्या दिवशी AB फॉर्म पंजाबराव

डख यांच्या नावाने आला. त्यामुळे वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार म्हणून पंजाब डख यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.

****

अमरावतीच्या खासदार नवनीत राणा यांचे जात प्रमाणपत्र सर्वोच्च न्यायालयाने वैध ठरवले आहे. त्यामुळे लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राणा यांना मोठा दिलासा मिळाला आहे. नवनीत राणा जात प्रमाणपत्र प्रकरणी आज सर्वोच्च न्यायालयात अंतिम सुनावणी पार पडली. न्यायमूर्ती जे. के. महेश्वरी आणि संजय करोल यांच्या खंडपीठाने उपरोक्त निकाल दिला. मुंबई उच्च न्यायालयाने ८ जून २०२१ रोजी राणा यांचे जात प्रमाणपत्र रद्द केले होते. त्यांना न्यायालयाने दोन लाख रुपयांचा आर्थिक दंड देखील ठोठावला होता. त्या निर्णयाला राणा यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. माजी खासदार आनंदराव अडसूळ आणि सुनिल भालेराव या नेत्यांनी राणा यांच्या जात प्रमाणपत्रावर आक्षेप घेणाऱ्या याचिका २०१७ मध्ये दाखल केल्या होत्या. राणा यांनी निवडणूक अर्ज दाखल करताना अनुसूचित जमातीबाबत दिलेले प्रमाणपत्र बोगस आहे. जात प्रमाणपत्र समितीसमोरही त्यांनी खोटा जातीचा दाखला दिलेला आहे, असा आरोप या याचिकांच्या माध्यमातून करण्यात आला होता.

****

यंदा होणारी लोकसभेची निवडणूक ही भारताला विकसीत राष्ट्र बनविण्यासाठीची निवडणूक आहे. भारताचा विकास अत्यंत गतीने होत असल्याचे प्रतिपादन भाजपचे ज्येष्ठ नेते, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज केले. बिहारच्या जमुई जिल्ह्यातील बल्लोपूर इथं झालेल्या जाहीर सभेत ते बोलत होते. जनता दल युनायटेडचे अध्यक्ष, बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांची यावेळी उपस्थिती होती.

****

काँग्रेसच्या जेष्ठ नेत्या सोनिया गांधी, केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव, भाजपचे आर पी एन सिंह आणि काँग्रेसचे अजय माकन यांच्यासह १२ जणांनी आज राज्यसभा सदस्यत्वाची शपथ घेतली. उपराष्ट्रपती व राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यांनी त्यांना पद व गोपनीयतेची शपथ दिली.

****

काँग्रेसचे प्रवक्ते गौरव वल्लभ यांनी आज भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश केला. भाजपाचे महासचिव विनोद तावडे यांच्या उपस्थितीत त्यांनी गौरव वल्लभ यांनी भाजपमध्ये प्रवेश घेतला. यावेळी बिहार काँग्रेसचे माजी अध्यक्ष अनिल शर्मा यांनीही भाजपमध्ये प्रवेश केला.

****

राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्याची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा 'लोकनिर्णय महाराष्ट्राचा' हा कार्यक्रम आकाशवाणीनं सुरु केला आहे. कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण भंडारा गोंदिया लोकसभा मतदारसंघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

****

राज्यात आज वर्धा इथं सर्वाधिक ४२ पूर्णांक ५ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. मराठवाड्यात धाराशिव ४१ अंश सेल्सिअस, बीड ४० पूर्णांक ५, लातूर ४० तर छत्रपती संभाजीनगरचं तापमान ३९.५ अंश सेल्सिअस एवढं नोंदवण्यात आलं. दरम्यान, येत्या शनिवार आणि रविवारी लातूर, बीड, धाराशिव आणि नांदेड जिल्ह्यात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता हवामान खात्यानं व्यक्त केली आहे.

****

लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगानं परभणी लोकसभा मतदार संघाचे निवडणूक निरीक्षक म्हणून कृष्णकुमार निराला आणि डॉ. विष्णुकांत यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयाला भेट देवून कामकाजाचा आढावा घेतला.

****

महाविकास आघाडीतून बाहेर पडण्याची प्रकाश आंबेडकरांची भूमिका दुर्दैवी असून ती भाजपला अनुकूल ठरणारी आहे, असं प्रतिपादन काँग्रेस नेते माजी खासदार भालचंद्र मुणगेकर यांनी केलं आहे. मुंबईतल्या गांधी भवन इथं पत्रकार परिषदेत ते आज बोलत होते.

****

मराठवाड्यातील पहिले प्लास्टिक सर्जन दिवंगत डॉ. अविनाश येळीकर यांच्या पहिल्या स्मृतीदिनानिमित्त छत्रपती संभाजीनगरमध्ये रविवारी त्यांच्यावरील गौरवग्रंथ

प्रकाशित करण्यात येणार आहे. एम जी एम च्या रुक्मिणी सभागृहामध्ये सकाळी अकरा वाजता हा कार्यक्रम होईल. प्रसिद्ध सर्जन डॉ. रविन थत्ते यांच्या हस्ते या ग्रंथाचे प्रकाशन होणार असून एमजीएम संस्थेचे अध्यक्ष कमलकिशोर कदम या कार्यक्रमाचे अध्यक्ष असतील. केंद्रीय अर्थराज्य मंत्री डॉ. भागवत कराड, विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे, एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, उद्योजक मधुकरराव मुळे यांचीही यावेळी उपस्थिती राहील, अशी माहिती गौरवग्रंथाचे संपादक, माजी कुलगुरू प्रा. डॉ. सुधीर गव्हाणे यांनी आज एका पत्रकार परिषदेत दिली.

****

देशात चांदीसाठी प्रसिद्ध असलेल्या कोल्हापूरमधल्या हुपरी इथल्या चांदीला भौगोलिक निर्देशांकाचं जी–आय मानांकन मिळालं आहे. हुपरीच्या चांदी कारखानदार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. परंपरागत हस्त कौशल्याचा ठेवा जतन व्हावा आणि इथं तयार होणाऱ्या चांदीच्या दागिण्यांचे वैशिष्ट्य कायम राहावे या उद्देशाने चांदी कारखानदार संघटनेचे शासकीय स्तरांवर प्रयत्न सुरू होते, अशी माहिती त्यांनी यावेळी दिली.

****

सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या भात विक्रीसाठी ऑनलाइन नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर बोनसचं वाटप करण्यात आलं आहे. शासनानं भात विक्रीसाठी ऑनलाइन नोंदणी केलेल्यांना प्रोत्साहन राशी देण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार जवळपास पाच हजार शेतकऱ्यांच्या खात्यात प्रति हेक्टर २० हजार रुपये एवढी रक्कम जमा करण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हा पणन अधिकारी दिलीप पाटील यांनी दिली. रक्कम प्राप्त झाल्यानंतर शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त केलं जात आहे.

****

महाराष्ट्रातील सर्वांत उंच असलेल्या कळसूबाईच्या शिखराजवळ स्थानिकांद्वारे महिलांना शिखरावर चढण्यास प्रतिबंध करणारा फलक लावण्यात आला होता. घरात विटाळ असल्यास संबंधित महिलांनी शिखर चढू नये तसंच शिखरावरील देवीच्या मंदिरात प्रवेश करू नये, अशा सूचना लिहिलेला एक फलक सुळक्याच्या पायथ्याला लावण्यात आला होता. नियमित येणाऱ्या गिर्यारोहकांनी याविरोधात समाज माध्यमांवर नाराजी व्यक्त केल्यानंतर महिला आयोगानं याची दखल घेतली.

आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी नगरच्या जिल्हाधिकाऱ्यांना कार्यवाहीच्या सूचना दिल्यानंतर हा फलक हटवण्यात आला.

****